ePaper

# आमचे गुरु शरद पवार, : धनंजय मुंडे यांचं विधान



| वर्ष - 7 । अंक -67 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- 'शहर राष्ट्रवादी'त फूट?
- शरद पवारांच्या निवासस्थानाबाहेर गर्दी
- 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा 'हिरवा कंदील'!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 6 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# साहेबांवर श्रद्धा; पण दादांना साथ!

## »'अजित गव्हाणे टीम'ची भूमिका : माजी आमदार विलास लांडे यांचाही सूचक संदेश

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील राजकारणाला गोत्यात आणणारा निर्णय काल शहर राष्ट्रवादीने घेतला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पिंपरी चिंचवड शहर कार्यकारिणीची बैठक दि. ४ जुलै रोजी राष्ट्रवादीच्या शहर कार्यालयात झाली. शहर कार्यकारिणीने एकमताने अजितपवार यांच्याबरोबर जाण्याचा निर्णय घेतला.**



याबाबत बोलताना राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी शहराच्या विकासाचा मुद्दा मांडला. १९९१ पासून या शहरात अजित पवार यांच्या विचारातून विकास झाला आहे. आम्ही सर्व दादांच्या मार्गदर्शनावर आणि नेतृत्वावर इथपर्यंत आलो आहोत. शरद पवार साहेबांवर आमचीही श्रद्धा आहेच. मात्र, आम्ही सर्वांनी एकमताने अजितदादा पावरांबरोबर जाण्याचा निर्णय घेतला आहे, असे पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी शहाराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी स्पष्ट केले आहे.

शहरात कालपर्यंत कोण कोणाबरोबर याचा संभ्रम होताच, मात्र राष्ट्रवादीच्या पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणीने निर्णय घेतला असल्याने चित्र स्पष्ट झाले आहे. शहरात शरद पवार यांच्या शब्दांवर काहीही सोडण्यास तयार असलेले आझमभाई पानसरे यांचे चिरंजीव निहाल पानसरे अजित गव्हाणेंबरोबर मुंबईकडे रवाना झाले आहेत.

देव्हाऱ्यात शरद पवार, मुलगा अजित पवारांच्या साथीला... तसेच, ज्यांच्या देव्हाऱ्यात देवांबरोबर शरद पवारांचा फोटो आहे, अशा विलास लांडे यांचे चिरंजीव विक्रांत लांडे हेही अजितदादांबरोबरच असल्याची माहितीही शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दिली आहे. काही मंडळी अजितदादांच्या शपथ विधीनंतर लगेच त्यांना शुभेच्छा देऊन आले होते त्यात प्रामुख्याने माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, भाऊसाहेब भोईर, नाना काटे आदी मंडळी होती. त्यामुळे शहर राष्ट्रवादी नक्की कोणाकडे याचा संभ्रम कार्यकर्त्यांमध्ये होता. शहर राष्ट्रवादीची सगळी टीम अजितदादांच्या बैठकीला भुजबळ सेंटरवर जाण्यासाठी रवाना झाल्यामुळे हा संभ्रम काहीसा निवळला असला तरी, राष्ट्रवादीच्या कार्यकारिणी आणि त्यांच्याशी संबंधित मंडळींव्यतिरिक्तचेही कार्यकर्ते शहरात आहेतच. त्यांचा निर्णय कळण्यासाठी कोणत्यातरी निवडणुकीची वाट पहावी लागेल.

### मुंबईतील बैठकीत उपस्थित प्रमुख दादा समर्थक...



»पिंपरी चिंचवडमधून अजितदादा पवार यांच्या बैठकीला राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, राजू मिसाळ, भाऊसाहेब भोईर, श्याम लांडे, राहुल भोसले, माजी नगरसेवक संजय वाबळे, मोरेश्वर भोंडवे, समीर मासुळकर, राष्ट्रवादी युवकचे विशाल वाकडकर, यश साने, प्रदिप तापकीर, श्याम जगताप, फजल शेख, इखलास सय्यद, सुशील मंचरकर, अक्षय माछरे, युवती अध्यक्षा वर्षा जगताप, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने मुंबईला रवाना झाले होते.

# 'पिंपरी-चिंचवड आयडॉल'द्वारे गायकांना व्यासपीठ

## » हर्षवर्धन भोईर यांचा पुढाकार : भाऊसाहेब भोईर यांचे मार्गदर्शन

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील गायकांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'पिंपरी-चिंचवड आयडॉल २०२३' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १५ ते ३५ वयोगटातील इच्छुकांनी त्यात सहभागी होण्यासाठी बुधवारपर्यंत (दि.५) सकाळी १० ते सायंकाळी ५.३० पर्यंत फॉर्म भरून घेतले आहेत, अशी माहिती आयोजक हर्षवर्धन भोईर यांनी केले आहे.**

स्पर्धेस गेली ७ वर्षे चांगला प्रतिसाद मिळाला असून त्यातील काही स्पर्धकांनी अनेक स्पर्धामध्ये गायक म्हणून पारितोषिक मिळविले आहे. या स्पर्धेमधील अनेक स्पर्धक व्यावसायिक रंगमंचावर गायक म्हणून नाव कमवीत आहेत. दोन वर्षे कोविड महामारीमुळे सदर स्पर्धेमध्ये खंड पडला होता. स्पर्धा




२०१४ पासून अविरत सुरू आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे पिंपरी-चिंचवड शाखा अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड आयडॉल 'मोरया करंडक'चे हे यशस्वी ८ वे वर्षे आहे. स्पर्धेचे फॉर्म सव्हे नं.१६४, मनिषा स्मृती निवास, भोईर नगर, चिंचवड येथे उपलब्ध असून बुधवारी (दि. ५) साडे पाच वाजेपर्यंत फॉर्म स्वीकारण्यात आले.



> औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडची ओळख सांस्कृतिकनगरी व्हावी, अशी अपेक्षा आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून विविध जाती-धर्माचे नागरिक शहरात वास्तव्य करित आहेत. त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा. या हेतूने ही स्पर्धा आयोजित केली जाते.
>
> **-हर्षवर्धन भोईर,** आयोजक.

# जिल्ह्यातील 84 गावांना पुराचा धोका!

## » जिल्हा प्रशासनाने रहिवाशांना दिला दक्षतेचा इशारा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रशासनाने जिल्ह्यातील पूरप्रवण गावांची यादी तयार केली आहे. त्यामध्ये दौंड तालुक्यातील सर्वाधिक १६ गावे आहेत. त्यानंतर मावळ तालुक्यातील दहा, आंबेगाव आणि शिरूरमधील प्रत्येकी नऊ, मुळशी तालुक्यातील सात, भोरमधील तीन गावांचा समावेश आहे. इंदापूर, बारामती, खेड या तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक, जुन्नरमधील दोन गावे आहेत.**



गेल्या काही वर्षांत जिल्ह्यांत पावसाचे प्रमाण वाढले आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने जिल्ह्यातील पूरस्थिती, पूरप्रवण गावे, दरडप्रवण क्षेत्रांचा आराखडा तयार केला आहे; तसेच आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित अधिकाऱ्यांनी जिल्हा मुख्यालयात थांबण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

पुणे, पिंपरी-चिंचवडमधील पूरप्रवण ठिकाणे

हिंगणे खुर्द, विठ्ठलवाडी, पुलाची वाडी, पाटील इस्टेट, येरवड्यातील शांतीनगर आणि इंदिरानगर, संगमवाडी, लोणी काळभोर, चांदे, वाकड, औंध, दापोडी, सांगवी, बाणेर, हिंगणगाव, पिंपरी, चिंचवड, कासारवाडी, फुगेवाडी, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, रहाटणी, चोवीसवाडी, निरगुडे, सांगवी.

### जिल्ह्यातील प्रमुख पूरप्रवण गावे

**» भोरमधील पऱ्हाटी, लुमेवाडी आणि नीरा, खेड तालुक्यामधील सांगुर्डी, आंबेगाव तालुक्यातील चांडोली, पारगाव, निगुडसर, नारोडी, चिंचोली, जवळे, पडवळ, गणेगाव दुमाला, बाभुळसर आणि तांदळी, जुन्नर तालुक्यातील सारवरगाव आणि नारायणगाव, हवेली तालुक्यामधील पिंपरी सांडस, डोंगरगाव, बुर्केगाव, पेरणे, आष्टापूर, नाव्ही सांडस, वडू खुर्द, शिरूरमधील शिक्रापूर, कोरेगाव भीमा, डिंग्रजवाडी, विठ्ठलवाडी, वडगाव रासाई, वढू बुद्रुक, आपटी, रांजणगाव, सांडस आणि म्हाळुंगे, दौंडमधील नांदूर, वडगाव, काशिंबे, गोनवडी, खोरवडी, वडगावढेरे, पेडगाव, सोनवडी, मलठण, बावडा, गणेशवस्ती, भांडगाव हातवळण, हिंगणेबेरडी आणि शिरापूर, इंदापूरमधील नीरा नरसिंहपूर, मावळमधील भावडी, पुलगाव, सांगवी सांडस, लोणावळा, कामशेत आणि वडगाव मावळ; तसेच देहू आणि आळंदी यांचा समावेश आहे.**

---

# फिरण्याचा मोह पर्यटकांच्या अंगलट

## »जीव वाचवण्यासाठी मुलांची धोकादायक कसरत, वनविभागावर प्रश्नचिन्ह

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यात पावसाला सुरूवात झाली आहे. त्यात जुन्नर तालुका हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. पाऊस सुरू झाल्याने या भागात डोंगर दऱ्यातील धबधबे वाहू लागले आहेत. जुन्नर तालुक्यात पर्यटनासाठी अनेक लोक वर्षा विहारासाठी येत असतात. या भागातील अनेक क्षेत्र हे वन विभागाच्या हद्दीत असल्याने वन विभागाकडून आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.**



मात्र जुन्नर आणि ठाणे जिल्ह्यामध्ये असणाऱ्या मुरमाड तालुक्यातील थितबी येथील काळू नदीवरील हा सर्व प्रकार आहे. पुणे जिल्हा आणि ठाणे जिल्ह्याचा हा बॉर्डरचा हा भाग असून काळू नदीवरील हा व्हिडिओ आहे. रविवारी तिथे आलेल्या पर्यटकांनी कोणतीही सुरक्षेची यंत्रणा उपलब्ध नसताना धबधबा ओलांडला. तिथे जाणाऱ्या पर्यटकांना गावकरी नेहमी विरोध करतात, पण पर्यटक ऐकत नाहीत. यातील बहुतांश भाग वनविभागाचा आहे. मात्र तिथे सुरक्षेसाठी कोणीही उपस्थित नसते, त्यामुळे चांगले फोटो आणि चांगले रील स्टोरी मिळवण्यासाठी अनेक पर्यटक जीव धोक्यात घालून हा धबधबा ओलांडतात. यात दोघांना वाहून जाताना वाचवले असले तरी वन विभागाकडून कोणतीही सुरक्षा इथे ठेवण्यात आलेली नाही. सुट्टीच्या दिवशी या ठिकाणी हजारोच्या संख्येने पर्यटक येत असतात. जीव धोक्यात घालून नदीचा प्रवाह दोरीच्या सहाय्याने पार करण्याचा प्रयत्न करतात. यात दोघांचा जीव जाता जाता वाचला आहे. त्यामुळे याठिकाणी उपाययोजना होणे गरजेचे आहे. नाहीतर पर्यटकांना नाहक आपला जीव गमावावा लागेल.

### निसर्गरम्य धबधबे पर्यटकांनी फुलले

**»जुन्नर तालुक्याच्या पश्चिम भागांतील सह्याद्रीच्या रांगेत वसलेल्या निसर्गरम्य दाऱ्या घाट, नाणे घाटात पर्यटकांची तोबा गर्दी होत आहे. गेल्या आठवड्यापासून या परिसरात संततधार सुरू असून पर्यटकांना येथील धबधबे आकर्षित करत आहेत. जुन्नरपासून 30 ते 40 किलोमीटर असलेल्या या पर्यटनस्थळांव्यतिरिक्त किल्ले चावंड, कुकडेश्वर, जुन्नर शहराजवळील शिवनेरी, लेण्याद्री, ओझर आदी ठिकाणीही गर्दी होत आहे. जुन्नरहून आपटाळे येथे गेल्यावर उजवीकडे नाणेघाट मार्ग आहे,**

---

# कोयता गँगची महाविद्यालयाच्या आवारात धिंड; पोलिसांचे नागरिकांकडून कौतुक!



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्वे रस्त्यावर एका महाविद्यालयाच्या आवारात कोयता उगारुन दहशत माजविणाऱ्या गुंडांची पोलिसांनी महाविद्यालयाच्या परिसरात धिंड काढली. दहशत माजविणाऱ्या गुंड टोळीला धडा शिकवल्याने नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले आहे.**

कानगुडेने ननावरेवर कोयता उगारून कर्वे रस्त्यावरील एका महाविद्यालयात दहशत माजविली होती. दहशत माजविण्याची ध्वनिचित्रफीत समाजमाध्यमात प्रसारित झाली होती. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. डॅनी ननावरे आणि साथीदार गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. शिवाजीनगर आणि डेक्कन पोलीस ठाण्यातील तपास पथकाला ही माहिती मिळाली होती. नदीपात्रात पोलिसांनी सापळा लावून आरोपी ननावरे आणि साथीदारांना पकडले. ओंकार उर्फ डॅनी बाळू ननावरे (वय २१) , गौतम उर्फ लखन अंबादास बनसोडे (वय २९, दोघे रा. राजेंद्रनगर), शाम विलास लोखंडे (वय २०), राम विलास लोखंडे (वय २३, दोघे रा. नवी पेठ), सुनील बाबासाहेब कांबळे (वय २०), रोहन चांदा कांबळे (वय १९), रोहन किरण गायकवाड (वय १९, तिघे रा. शिवाजीनगर), किरण सीताप्पा खेत्री (वय २०, रा. कात्रज) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून कोयता, स्टीलचा गज, चाकू जप्त करण्यात आला.

### पोलीस आयुक्तांकडून कौतुक

**»पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गुंडांवर कडक कारवाईचे आदेश दिले आहे. डेक्कन आणि शिवाजीनगर पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे डेक्कन भागातील नदीपात्रात सराइतांची टोळी पकडली गेली. पोलीस आयुक्त रितेश कुमार यांनी तपास पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांचे कौतुक केले असून पोलीस आयुक्तालयात बुधवारी सायंकाळी कारवाई करणाऱ्या पोलिसांचा सत्कार करण्यात आला.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'वर्ल्ड ऑफ वर्क'!

## युवकांना मिळणार नव्या संधी : समाज विकास विभागाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम

।पिंपरी।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**शहरातील तरुणांना आणि नवोदितांना कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात. या करिता पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने ग्लोबल अपॉर्च्युनिटी युथ नेटवर्कच्या भागीदारीत वर्ल्ड ऑफ वर्क (WOW) केंद्रे स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.**





पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) ला ग्लोबल अपॉर्च्युनिटी युथ नेटवर्क (GOYN) च्या सहकार्याने शहरात वर्ल्ड ऑफ वर्क (WOW) केंद्रांच्या स्थापनेला मान्यता मिळाली आहे. अस्पेन इन्स्टिट्यूट, यूएसए यांच्या नेतृत्वाखालील GOYN, जागतिक सहयोगी संस्था, जगभरातील तरुणांना सक्षम बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. लाइटहाऊस कम्युनिटीज फाऊंडेशन या प्रतिष्ठित ना-नफा संस्थेने आयोजित केलेल्या GOYN-पुणे कार्यक्रमाच्या यशानंतर, WOW उपक्रमाचा विस्तार आता पिंपरी-चिंचवडमध्ये राबवला जाणार आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये येत्या पाच वर्षात वर्ल्ड ऑफ वर्क सेंटर्स स्थापन करण्याच्या प्रस्तावाला गेल्या महिन्यात स्थायी समितीच्या बैठकीत एकमताने मंजुरी मिळाली. आयुक्त तथा प्रशासकशेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील युवकांच्या उन्नतीसाठी विधायक निर्णय घेण्यात आला. 'वर्ल्ड ऑफ वर्क' प्रोग्राम त्याच्या अभ्यासक्रमात तंत्रज्ञानाचा समावेश करण्यासाठी, स्केलेबिलिटी सक्षम करण्यासाठी डिझाइन केले आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मवर तरुणांना उपजीविकेच्या संधींची माहिती उपलब्ध होईल. 'वर्ल्ड ऑफ वर्क' सेंटर्समध्ये, तरुणांचा प्रवास ओरिएंटेशन सत्राने सुरू होतो आणि त्यानंतर योग्यता चाचण्या आणि करिअर समुपदेशन यांचा समावेश असलेले मूल्यांकन केले जाऊ शकते. करिअरच्या विकासासाठी एक चांगला दृष्टीकोन सुनिश्चित करून, मार्गदर्शन समर्थन देण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त राहणार आहे.

'वर्ल्ड ऑफ वर्क'चा उद्देश काय?

'वर्ल्ड ऑफ वर्क' प्रोग्रामचे उद्दिष्ट 15 ते 35 वयोगटातील, शहरी झोपडपट्ट्यांमध्ये किंवा कमी उत्पन्न असलेल्या समुदायांमध्ये राहणाऱ्या तरुण व्यक्तींना उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देणे आहे. हा उपक्रम रोजगार शोधणाऱ्या किंवा स्वयंरोजगाराच्या संधी शोधणाऱ्या तरुणांसाठी एक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देतो. कार्यक्रम संबंधित आजीविका माहिती आणि मार्गदर्शन समर्थन प्रदान करतो. याचे प्राथमिक उद्दिष्ट तरुणांना समुपदेशनाद्वारे करिअर पर्याय समजून घेणे, त्यांची क्षमता शोधणे, ध्येय निश्चित करणे, व्यावसायिक कौशल्य आणि रोजगाराच्या संधींशी जोडणे हे आहे, जे भौतिक केंद्रे, हेल्पलाइन आणि डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे केले जाते. याव्यतिरिक्त, हा कार्यक्रम उच्च माध्यमिक शिक्षण घेत असलेल्या, सूक्ष्म-व्यवसायांची स्थापना आणि संलग्न समर्थन सेवांमध्ये प्रवेश करणाऱ्यांना समर्थन देतो.



> कौशल्य संस्था आणि उद्योजकता विकास संस्थांचे संदर्भ वैयक्तिक आकांक्षा आणि उद्दिष्टांवर आधारित 'वर्ल्ड ऑफ वर्क'मध्ये विविध उपक्रम आयोजित केले जातात. याव्यतिरिक्त, 'वर्ल्ड ऑफ वर्क' केंद्रे हायस्कूल शिक्षण पूर्ण करण्यात मदत करतात आणि शालेय शिक्षण किंवा उद्योजकतेसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये समर्थन देतात. WOW सेंटर्समध्ये प्लेसमेंट कौशल्य संस्था किंवा वॉव सेंटर टीमद्वारे होऊ शकते. पिंपरी चिंचवडमध्ये वर्ल्ड ऑफ वर्क सेंटर्सची स्थापना तरुणांना सक्षम बनवण्यासाठी आणि त्यांच्या रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.
>
> **- अजय चारठाणकर,** उपायुक्त, समाज विकास विभाग.

# डॉ. भाग्यश्री पाटील यांचा 'व्यावसायिक गुणवत्ता' पुरस्काराने गौरव

## रोटरी डिस्ट्रिक्ट 3131 द्वारे सन्मान : सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल

।पिंपरी। महाईन्यूज।प्रतिनिधी।

**डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र - कुलपती, राइज एन शाईन बायोटेक कंपनीच्या संस्थापक डॉ. भाग्यश्री पी. पाटील यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ द्वारे प्रतिष्ठित रोटरी यांच्या तर्फे व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**



डॉ. भाग्यश्री पाटील यांच्या शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील अथक प्रयत्नांमुळे असंख्य लोकांच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम झाला आहे. संस्थेच्या कुलपती या नात्याने शैक्षणिक सर्वोत्कृष्टता गाठण्यासाठी अथक प्रयत्नातून त्यांनी विद्यापीठाचा नावलौकिक वाढवला आहे. आज हे विद्यापीठ जगभरात प्रसिद्ध आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे यासाठी त्यांना सर्वांगीणदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्या सदैव कार्यरत असतात. संशोधन, नवकल्पना, सर्वांगीण शिक्षण आणि विकासाला चालना देण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे शिक्षण क्षेत्रात नवे मापदंड स्थापन केले आहेत.

डॉ. भाग्यश्री पाटील यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली देशातील वनस्पती जैवतंत्रज्ञानातील अग्रणी अशी राईज एन शाईन बायोटेक प्रा. लि. ही आघाडीची कंपनी उभी राहिली आहे. २००३ मध्ये त्यांनी या कंपनीची सुरुवात केली. या कंपनीने थेऊर आणि जवळपासच्या १० ते १२ गावांमधील एक हजार ग्रामीण महिलांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध केले आहे.

एक निरोगी राष्ट्र निर्माण करण्याच्या उद्देशाने डॉ. भाग्यश्री पाटील यांनी डीपीयू सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अवयव प्रत्यारोपण विभाग सुरू केला. त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली हा विभाग आज उत्कृष्ट अवयव प्रत्यारोपण केंद्र म्हणून विकसित झाला आहे. त्याचबरोबर डॉ. भाग्यश्री पाटील यांनी यशोदा मातृदुग्ध पेढी या अत्याधुनिक दूध बँकेची स्थापनाही केली आहे. हे स्तनपान व्यवस्थापन, प्रशिक्षण आणि संशोधन केंद्र असून, अकाली जन्मलेल्या आणि कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती असलेल्या बाळांसाठी दूध उपलब्ध करून देणारा पिंपरी चिंचवड परिसरातील हा अशा प्रकारचा पहिला उपक्रम आहे. सुरक्षित आणि निरोगी दुग्धदाते निर्माण करण्यावर त्यांचा भर आहे. हा एक अभिनव माता आणि बाल केंद्रित उपक्रम आहे.

डॉ. भाग्यश्री पाटील यांच्या सातत्यपूर्ण कार्यातून व्यावसायिक सेवा आणि सामाजिक उन्नतीसाठी त्यांची कटीबद्धता दिसून येते. रोटरी इंटरनॅशनल व्होकेशनल एक्सलन्स पुरस्कार त्यांच्या या उल्लेखनीय कार्याला मिळालेली ओळख आहे.

> 'व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार' हा मानाचा पुरस्कार मला मिळाला हा माझा सन्मान समजते. अतिशय नम्रतापूर्वक मी त्याचा स्वीकार करते. मला मानवजातीची सेवा करण्याची आणि लोकांच्या जीवनात बदल घडवून आणण्याची संधी दिल्याबद्दल मी सर्वोच्च शक्तीप्रती कृतज्ञ आहे." पाटील पुढे म्हणाल्या, "या पुरस्काराद्वारे माझ्या कामाची दखल घेतल्याबद्दल आणि कौतुक केल्याबद्दल रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन मंजू फडके, संचालक राजू सुब्रमणियन आणि रोटरी क्लबच्या सदस्यांची मी मनःपूर्वक आभारी आहे."
>
> **- डॉ. भाग्यश्री पाटील,**
> **प्र - कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ.**

# आता मतदारांची जबाबदारी वाढली





**तत्व आणि निष्ठेच्या गप्पा मारीत राजकीय नेते जेव्हा कंबरेचे सोडून डोक्याला गुंडाळीत सत्ता पदे ओरबाळून घ्यायला लागतात अश्यावेळी सामान्य लोकांची पर्यायाने मतदारांची जबाबदारी अधिक वाढत असते. कोणत्याही राज्यात सगळ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची संख्या पन्नास टक्के गृहीत धरली तर खरी भिस्त उरलेल्या पन्नास टक्के लोकांवर असते.**

ज्यांचा कधीही कुण्या पक्षाशी काहीही संबंध नाही मात्र राजकीय प्रयोगाचे परिणाम ज्यांना भोगावे लागतात अश्या लोकांनी हे राजकीय प्रयोग लक्षात ठेवले पाहिजेत आणि आपल्या हातात ज्यावेळी याना वठणीवर आणण्याची क्षमता येईल त्यावेळी आपले मत बिनधास्त व्यक्त केले पाहिजे. कोणताही पक्ष लोकांशी संवाद साधूनच त्यांचे मतपरिवर्तन करीत असतो आणि आपली बाजू पटवून सांगत असतो. अश्यावेळी नेत्यांनी कोणते अकलेचे तारे तोडले आणि पुढे स्वतः मांडलेली मते कशी पायदळी तुडवली याचे योग्य प्रकारे माप काढून ठेवले पाहिजे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला फोडण्याच्या घटनेमुळे जशी सामान्य मतदारांची जबाबदारी वाढली तशी पुरोगामी आणि संविधान चाहत्यांची सुद्धा वाढली आहे. वर वर ही घटना केवळ भाजपच्या सत्ताकांक्षेची जरी दिसत असली तरी त्याच्या तळाशी कट्टर आणि संघ विचार या राज्यात कसा कायम करता येईल याचे दूरगामी नियोजन दिसते. गेली पाच दशके महाराष्ट्रात संघ विचारांचा शरद पवार मोठा अडसर म्हणून काम करीत होते. शरद पवार यांनी कधी उघडपणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा मनुवादावर हल्ले चढवले नसले तरी याबाबत त्यांच्या विचारात स्पष्टता जाणवत राहिली आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाचा प्रभाव केवळ मराठा



समाजात नव्हे तर राज्यातील बहुजन समाज आणि अठरा पगड जातींवर राहिला आहे. त्यामुळे आजवर संघाचा छुपा अजेंडा पुढे जाण्यात पवार सतत अडसर राहिले आहेत म्हणून पहिला घाव त्यांच्याच घरावर घालण्याचे हे नियोजन यशस्वी झाले आहे.

शरद पवार आणि अजित पवार यांच्यात कठोर परिश्रम आणि लोकसंग्रह हे समान गुण सोडले तर इतर कोणत्याही बाबतीत साम्य दिसत नाही. शरद पवार यांच्या वैचारिक संकल्पना सुस्पष्ट आहेत त्यांना उद्याच्या पन्नास वर्षात होणारे सामाजिक,राजकीय परिणाम ओळखता येतात. सततच्या वाचन, श्रवणामुळे एक वैचारिक खोली त्यांना आली आहे. त्यामुळे संघ परिवाराच्या एखाद्या कृतींमागील अन्वयार्थ त्यांना काढता येतो तो मात्र अजित पवारांना काढणे जमत नाही कारण वैचारिक खोली नाही. आज भाजपने सत्तेसाठी मराठा,बहुजन नेत्यांना सोबत घेतले घेतले असले तरी त्यांची उपयोगिता संपल्यावर या सगळ्यांना बाजूला टाकले जाणार आहे ,भाजपने आजवर देशाच्या इतर राज्यातही हीच पद्धत वापरली आहे. कोणेएके काली राज्यात दरारा असणारे नारायण राणे यांची आजची स्थिती लक्षात घेतली तर लक्षात येईल की भाजप किंवा संघ परिवाराला ,मराठा,बहुजन एका मर्यादित काळासाठी जवळचे वाटतात,सर्वकाळ नाही.

काही वर्षांपूर्वी पुरोगामी चळवळी आणि त्यांचे वैचारिक नेते संघ परिवाराच्या पडणाऱ्या प्रत्येक पावलामागील अर्थ ओळखून समाजाला जागृत करीत होते. डॉ. आ.ह. साळुंखे.बाबा आढाव, श्याम मानव, डॉ. नरेंद्र दाभोलकर,कुमार सप्तर्षी,ज्ञानेश महाराव,गोविंद पानसरे, हरी नरके,उत्तम कांबळे,रावसाहेब कसबे या सगळ्यांची वैचारिक नाळ शरद पवार यांच्याशी जुळलेली होती. राज्यात चालणाऱ्या या विवेक जागराचे आधारस्तंभ पवार आहेत याची संघ परिवाराला उत्तम जाण आहे त्यामुळे कट्टर लोकांनी दाभोलकर ,पानसरे यांचा काटा काढून चळवळ खिळखिळी करण्याचा प्रयत्न केला. उर्वरित लोकांना विविध प्रकाराने थांबविण्याचे प्रयत्न केले आहेत. त्याचा प्रयत्नाचा एक भाग म्हणून सतार आणि कोल्हापूरच्या दोन्ही गाद्या मॅनेज केल्या आहेत. केवळ शरद पवार मॅनेज होत नाहीत म्हणून हा अखेरचा घाव त्यांच्या कुटुंबावर घालून राष्ट्रवादी तोडण्याचा मोठा प्रयत्न झाला आहे.

या सगळ्या घटनांचा विचार केल्यावर आता मतदार म्हणून आपल्या प्रत्येकाच्या हातात केवळ मतदान हेच एकमेव प्रभावी हत्यार उरले आहे. ते कुणीही आपल्या हातातून काढून घेऊ शकत नाही मात्र तशी परिस्थिती निर्माण होणारच नाही या भ्रमात कुणी राहू नये. विचार करणाऱ्या आणि राजकीय घटनांची योग्य संगती लावण्याची बौद्धिक क्षमता असणाऱ्या प्रत्येकाने यापुढे अतिशय सावध पावले उचलून लोकशाहीवर आलेली ही टोळधाड पिटाळून लावावी लागेल. भाजपने आजवर जसा इतर लहान पक्षांचा वापर करून त्यांना फेकून दिले तसाच प्रयोग राज्यात झाल्यास नवल वाटणार नाही. एकनाथ शिंदे आणि त्यांच्या ५० सहकाऱ्यांच्या बाबतीत उद्या असे घडणार नाही हे कुणीच खात्रीने सांगू शकणार नाही. सरकारला बहुमताची गरज नसताना शिंदे यांच्या सहकाऱ्यांच्या अथक श्रमांवर पाणी फेरण्याची कृती फडणवीस का करू शकले हे आता समजून घेण्याची गरज आहे.

## संपादकीय »

### वंदन करुन, आशीर्वाद हवाय


***अजित पवार नेमके तसेच शरद पवार यांना 'वंदन करून' वेगळी वाट चोखाळत आहेत आणि तरीही त्यांना गुरू मानत आहेत! 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष' नेमका कुणाच्या ताब्यात जाणार, या लढाईला सोमवारी शेवटी तोंड फुटले.***

ही लढाई आता शिवसेनेप्रमाणेच विधिमंडळ, निवडणूक आयोग आणि अखेर न्यायव्यवस्था अशा तिहेरी अंगांनी पुढे जाईल, असे दिसते. शिवसेनेची कायदेशीर लढाई पुरती संपली नसली तरी एकनाथ शिंदे यांच्याकडे बहुसंख्य आमदार असल्याने विधिमंडळात तसेच निवडणूक आयोगात त्यांनी बाजी मारली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल गुंतागुंतीचा असला तरी त्यांना तसा दिलासाच मिळाला आहे. नेमक्या याच न्यायवाटेवरून राष्ट्रवादी काँग्रेसची लढाई जाईल, असे दिसते. या दोन्ही गटांच्या लढाईला राज्य पातळीवरील संघर्ष मानून 'राष्ट्रीय अध्यक्ष' या नात्याने शरद पवार त्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न रविवारी करीत होते. चिन्ह, नावाच्या लढाईत अडकण्यापेक्षा मी पुन्हा जनतेत जाईन, असे म्हणत होते.

**कोणत्याही याचिकादाराने स्वत:कडे व्यापक जनहिताची भूमिका घेऊन न्यायालयात नेमकी कोणत्या कारणांसाठी धाव घ्यायची; याचे सूत्र, नियम, विवेक आणि संकेत असायला हवेत. ते पाळले न गेल्याने न्यायालयांचा वेळ वाया जातो. अनेकदा अशा याचिकांचा उद्देश अशा विषयांची चर्चा समाजासमोर व्हावी, असा असतो.**

## न्यायावरचा अन्याय

जनहित याचिका हे सर्वसामान्य भारतीय नागरिकाच्या हातातील न्यायिक शस्त्र आपोआप आलेले नाही. तसेच, या प्रभावी अस्त्रासाठी भारतीय राज्यघटनेतही काही खास व्यवस्था करण्यात आलेली नाही. 'न्यायालयीन पुनर्विलोकन' या घटनेतील महत्त्वाच्या मूल्य आणि तरतुदीमधून ही व्यवस्था विकसित होत आली आहे. जनहित याचिका म्हणजे पीआयएलच्या भारतातील उद्गमाचे श्रेय द्रष्टे न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्ण अय्यर यांना द्यायला हवे. गेल्या शतकात आधी न्या. अय्यर यांनी ही कल्पना मांडली. पुढे आणली. त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळातील दुसरे असामान्य न्यायमूर्ती पी. एन. भगवती यांनी ही जनहित याचिकेची संकल्पना आपल्या न्यायप्रणालीत रुजवली. या संकल्पनेला एक चौकट आखून दिली. ही व्यवस्था चांगली रुळल्यापासून म्हणजे १९८५ पासून २०१९ पर्यंत सर्वोच्च न्यायालयात नऊ लाख २३ हजार २७७ जनहित याचिका दाखल करण्यात आल्या. हा वेग पाहता आज हा आकडा दहा लाखांच्यावर गेला असणार. यातून दोन-तीन गोष्टी सिद्ध होतात. एक तर नेहेमीची, सर्वसाधारण न्यायालयीन प्रक्रिया न्याय देण्यास अपुरी पडते आहे. दुसरे म्हणजे, निकालांची मंदगती पाहता 'आमच्या प्रश्नाकडे तातडीने पाहा' हा नागरिकांचा टाहो या याचिकांच्या रूपाने न्यायालयात येतो आहे. तिसरी आणि महत्त्वाची बाब म्हणजे, भारतीय संसदीय लोकशाहीत निर्माण केलेल्या इतर संस्था,



यंत्रणा आणि व्यवस्था नागरिकांच्या हिताचे, कल्याणाचे काम करण्यात कमी पडत आहेत.जनहित याचिकांचे मोल आधुनिक भारताच्या इतिहासात असे अधोरेखित होत असताना 'किरकोळ कारणांसाठी याचिका दाखल करून न्यायालयाचा वेळ वाया घालवू नका...' असा सज्जड इशारा खुद्द सरन्यायाधीशांना द्यावा लागावा; काही याचकांना त्यासाठी दंड ठोठवावा लागावा आणि अनेक याचिका 'फेकून द्याव्या' लागाव्यात, यावरून बरेच भारतीय नागरिक कोणत्याही चांगल्या साधनांचा, व्यवस्थांचा गैरवापर करण्यास कसे सोकावले आहेत, हेच दिसते. ही अपशकुनी विकृती भारतीयांच्या अगदी नसानसात भिनली आहे. उद्या या वागण्याने हे अत्यंत अमोघ असे शस्त्र म्यानच करण्यात आले तर काय करायचे?

## ॥ अभंगवाणी ॥



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अजित पवारांची मोठी खेळी!

## » शपथविधीच्या आधीच राष्ट्रवादी काँग्रेसवर दावा

### निवडणूक आयोगात याचिका दाखल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर मोठी बातमी समोर आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समर्थक आमदारांसह रविवारी मंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र, या शपथविधीच्या दोन दिवस आधीच अजित पवार यांनी राष्ट्रवादी पक्षावर दावा केला होता. अजित पवार यांनी शपथविधीआधी निवडणूक आयोगात याचिका दाखल केली.**



या याचिकेवर राष्ट्रवादीचे खासदार आणि आमदार मिळून अशा एकूण 40 जणांच्या सह्या आहेत. अजित पवार यांनी शपथविधीच्या आधी विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर आता अजित पवार यांनी पूर्ण पक्षावर दावा केल्याची बातमी समोर आली आहे. यामध्ये अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष असल्याचे म्हटले आहे, अशी माहिती मिळत आहे.

अजित पवार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे याचिका दाखल केली. पक्षाच्या 40 आमदार आणि खासदारांनी मिळून ठराव केला. या ठरावात अजित पवार यांचा दावा योग्य असल्याचे म्हटले. हा ठराव देखील याचिकेसोबत जोडण्यात आला. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासाठी हा मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे. निवडणूक आयोगात दाखल कागदपत्रांमध्ये अजित पवार यांची सर्वमताने राष्ट्रवादी अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे पत्र देखील देण्यात आले आहे, अशी माहीत आयोगाच्या सूत्रांनी दिली आहे.

राष्ट्रवादीच्या चिन्हासाठी आता निवडणूक आयोगात लढाई होणार का? याकडे लक्ष लागले आहे. 3 जुलैला जयंत पाटील यांच्याकडून कॅविएट दाखल करण्यात आले आहे. 3 जुलैलाच जयंत पाटील यांनी 9 आमदारांवर अपात्रतेची कारवाईसाठी पत्र दिल्याचे निवडणूक आयोगाला कळवले आहे.

अजित पवार यांनी २ जुलै रोजी राष्ट्रवादीत बंडाचा झेंडा फडकवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या इतर आठ आमदारांनीही शपथ घेतली. अजित पवार यांची ही कृती पक्षविरोधी असल्याचे सांगत शरद पवार गटाने अजित पवार यांच्यासह ९ जणांवर पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवून त्यांना अपात्र ठरविण्याची मागणी विधानसभा अध्यक्षांकडे केली आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही गटाने स्वतंत्र बैठकीचे आयोजन केले होते. शरद पवार यांच्या गटाची बैठक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात पार पडली.

### शरद पवार यांच्याकडील आमदार

»जयंत पाटील (इस्लामपूर), जितेंद्र आव्हाड (मुंब्रा- कळवा), अनिल देशमुख (काटोल ), बाळासाहेब पाटील (उत्तर कराड), राजेश टोपे (घनसावंगी), राजेंद्र शिंगणे (सिंदखेडराजा), अशोक पवार (शिरूर) मकरंद पाटील (वाई), प्राजक्त तनपुरे (राहुरी), चेतन तुपे (हडपसर), चंद्रकांत नवघरे (बसमत), रोहित पवार(कर्जत जामखेड), सुमन पाटील (तासगाव कवठेमहांकाळ), सुनील भुसारा (विक्रमगड), किरण लहामटे (अकोले), संदीप क्षीरसागर(बीड), मानसिंग नाईक (शिराळा), दौलत दरोडा (शहापूर). यापैकी मकरंद पाटील, नवघरे आणि दरोडा बैठकीला उपस्थित नव्हते. विधान परिषद सदस्य : एकनाथ खडसे, बाबाजान दुराणी, शशिकांत शिंदे, खासदार : श्रीनिवास पाटील, सुप्रिया सुळे, डॉ.अमोल कोल्हे, वंदना चव्हाण, फौजिया खान

### अजित पवार यांच्याकडील आमदार

»छगन भुजबळ (येवला), दिलीप वळसे पाटील(आंबेगाव), हसन मुश्रीफ (कागल), धनंजय मुंडे (परळी) आदिती तटकरे (श्रीवर्धन), धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), संजय बनसोडे (उदगीर), अनिल पाटील (अमळनेर), बाळासाहेब आजबे (आष्टी), राजू कारेमोरे(तुमसर), आशुतोष काळे (कोपरगाव), माणिकराव कोकाटे (सिन्नर), मनोहर चंद्रिकापुरे (अर्जुनी मोरगाव) दिपक चव्हाण (फलटण), संग्राम जगताप (अहमदनगर शहर), नरहरी झिरवाळ (दिंडोरी), सुनील टिंगरे (वडगाव शेरी), इंद्रनील नाईक (पुसद), शेखर निकम (चिपळूण), नितीन पवार (कळवण), बाळासाहेब पाटील (अहमदपूर), राजेश पाटील (चंदगड), दिलीप बनकर (निफाड), अण्णा बनसोडे (पिंपरी), अतुल बेनके (जुन्नर), दत्तात्रय भरणे (इंदापूर), यशवंत माने (मोहोळ), दिलीप मोहिते (खेड आळंदी), नीलेश लंके (पारनेर) बबनराव शिंदे (म्हाडा), सुनील शेळके (मावळ), प्रकाश सोळंके (माजलगाव), देवेंद्र भोयार (अपक्ष, मोर्शी)

---

## अजित पवारांच्या कृत्यावरून जितेंद्र आव्हाडांचा हल्लाबो

।मुंबई।

अजित पवारांसह काही आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आहे. अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर आणि चिन्हावर दावा सांगितला आहे. एवढंच नव्हे तर आपणच पक्षाचे अध्यक्ष आहोत, अशा आशयाचं पत्रही त्यांनी निवडणूक आयोगाकडे पाठवलं आहे. या पत्रावर ४० आमदारांच्या सह्या असल्याचं बोललं जात आहे. अजित पवारांच्या या कृत्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे.

मला अजित पवारांची मानसिकता महाराष्ट्राला सांगायची आहे, असं म्हणत जितेंद्र आव्हाडांनी टीकास्त्र सोडलं आहे. अजित पवारांनी पक्षावर ठोकलेल्या दाव्याबाबत विचारलं असता जितेंद्र आव्हाड म्हणाले, “मला त्यांची (अजित पवार) मानसिकता महाराष्ट्राला सांगायची आहे. आपण जी राक्षसी महत्त्वकांक्षा म्हणतो, ती महाराष्ट्राला सांगायची आहे. त्या काकाला (शरद पवार) पूर्णपणे गिळून टाकायचं आहे, ही राक्षसी महत्त्वकांक्षा त्यांनी स्वत: महाराष्ट्रापुढे उघड केली आहे.”

अजित पवारांना उद्देशून जितेंद्र आव्हाड पुढे म्हणाले, “तुम्ही किती तारखेला निवडणूक आयोगाकडे गेले होते? आणि किती तारखेला जाहीर केलं? तुम्ही १ किंवा २ जुलैला निवडणूक आयोगाकडे जाता आणि ५ जुलैला हे जाहीर करता. तोपर्यंत सगळं लपवून ठेवता. तुम्ही कायद्याच्या सगळ्या बाजू गुंडाळून या देशाला कोणत्या दिशेनं घेऊन जात आहात.” “मला या गोष्टीचं वाईट वाटतं की, ज्या शरद पवारांनी हा वटवृक्ष निर्माण केला. त्यालाच घरट्यातूनच बाहेर काढायचं. शरद पवारांनी तुमची कोणतीच महत्त्वाकांक्षा कधीच रोखली नाही.

## अन् प्रफुल पटेलांचा फोटो कार्यालयाबाहेर फेकला

### » दिल्लीची जबाबदारी दिली सोनिया दूहान यांच्या खांद्यावर

। धुळे ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या राजकारणात रविवारी (दि.२ जुलै) मोठी उलथापालथ झाली. राष्ट्रवादीत उभी फूट पडून विरोधी पक्षनेते असलेले अजित पवार हे शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले. अजित पवार यांच्या शरद पवारांचे विश्वासू मानले जाणारे प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे, दिलीप वळसे पाटील यांनीही बंडाला साथ दिली. यामुळे शरद पवारांसाठी मोठा धक्का मानला जात आहे.**

या बंडानंतर शरद पवार यांनी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. दरम्यान बंडानंतर पवार यांनी पक्षांतर्गत पुन्हा भाकरी फिरवण्यास सुरूवात केली आहे. शरद पवार यांनी दिल्ली राष्ट्रवादी काँग्रेसबाबतही मोठा निर्णय घेतला आहे. दिल्लीची जबाबदारी पवारांनी आपल्या विश्वासू असलेल्या नेत्यांवर सोपवली आहे. त्याबाबत पत्र जारी केले आहे. तसेच पवार यांनी ट्विटद्वारे याबाबत माहिती दिली.

दिल्ली राष्ट्रवादी काँग्रेसची जबाबदारी सोनिया दूहान यांच्या खांद्यावर देण्यात आली आहे. सोनिया दूहान या शरद पवार यांच्या अत्यंत निकटवर्तीय मानल्या जातात. राष्ट्रवादी काँग्रेसमधील तरुण फळीतील सोनिया या आश्वासक चेहरा मानला जातो. सोनिया या त्याच आहेत ज्यांनी राष्ट्रवादीत झालेल्या मागच्या बंडावेळी महत्त्वाची भूमिका बजावली होती. आताही बंड झाल्यानंतर त्या शरद पवार यांच्यासोबत ठामपणे उभ्या आहेत.

शरद पवार यांनी ट्विट केलेल्या पत्रात म्हणाले, "राष्ट्रवादी काँग्रेसमधील सर्व पदाधिकाऱ्यांना हे सूचित केले जात आहे की की, नवी दिल्ली राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाच्या प्रमुख सोनिया दूहान या असतील." बंडानंतर झालेल्या नियुक्तीनंतर दूहान ॲक्शनमोडमध्ये आल्या. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवी दिल्ली कार्यालयातील प्रफुल पटेल यांचा फोटो बाहेर काढला. यातून त्यांनी बंड करणाऱ्या पक्षातील पदाधिकाऱ्यांबाबत आपला रोष व्यक्त केल्याची चर्चा आहे.



दरम्यान, फूट पडल्यानंतर अजित पवार आणि शरद पवार यांच्यात राष्ट्रवादी काँग्रेसबाबत दावे प्रतिदावे सुरू झाले आहेत. शरद पवार यांनी प्रफुल पटेल व सुनील तटकरे यांची पक्षातून हकालपट्टी केली. तर अजित पवार यांनी जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड यांच्या अपात्रेबाबत विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहिले आहे. तर शरद पवारांनी दिल्ली राष्ट्रवादी काँग्रेसची जबाबदारी सोनिया दूहान यांच्याकडे सोपवली आहे.

# खलिस्तानवाद्यांचा पुन्हा हल्ला!

## » सॅन फ्रान्सिस्कोमधील भारतीय वाणिज्य दूतावासात जाळपोळ

। न्यूयॉर्क । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सॅन फ्रान्सिस्कोमधील भारतीय वाणिज्य दूतावासात खलिस्तान समर्थकांनी जाळपोळ करण्याचा प्रयत्न केला. सॅन फ्रान्सिस्कोतील भारतीय दूतावासावर काही महिन्यांत झालेला हा दुसरा हल्ला आहे. या आधी १९ मार्च रोजी येथे खलिस्तानवाद्यांनी अडथळे तोडून खलिस्तानी ध्वज फडकावला होता.**




खलिस्तानवाद्यांनी २ जुलै २०२३ रोजी 'ट्विटर'वर एक ध्वनिचित्रफित प्रसृत केली होती. त्यात ते सॅन फ्रान्सिस्कोमधील भारतीय दूतावासाला आग लावण्याचा प्रयत्नांत दिसत आहेत. या ध्वनिचित्रफितीत 'हिंसा हे हिंसेचे उत्तर आहे' असे शब्द वापरले आहेत. त्यात कॅनडातील 'खलिस्तान टायगर फोर्स'चा (केटीएफ)) प्रमुख हरदीपसिंग निज्जर यांच्या मृत्यूशी संबंधित बातम्याही दाखवण्यात आल्या आहेत.

या दूतावासात शनिवारी पहाटे दीड ते अडीचच्या दरम्यान हल्ला करून जाळपोळ करण्यात आली. यात कोणीही जखमी झालेले नाही. अग्निशमन दलाने त्वरित आग आटोक्यात आणली. ८ जुलै रोजी खलिस्तान स्वातंत्र्य मोर्चा आयोजित केला जाईल, असे संदेशही प्रसारित झाले. दरम्यान, दिल्लीत मंगळवारी भारताच्या परराष्ट्र खात्याने कॅनडाच्या उच्चायुक्तांना पाचारण करून कॅनडातील भारतविरोधी कारवायांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

### अमेरिकेकडून निषेध

»अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांनी सोमवारी केलेल्या 'ट्वीट'मध्ये नमूद केले, की सॅन फ्रान्सिस्को येथील भारतीय वाणिज्य दूतावासात शनिवारी झालेल्या तोडफोड आणि जाळपोळीच्या प्रयत्नाचा अमेरिका तीव्र निषेध करत आहे. अमेरिकेतील विदेशी दूतावास किंवा परदेशी मुत्सद्दींवर हल्ले व हिंसाचार हा गुन्हा आहे.

---

## रेल्वेच्या प्राथमिक सुरक्षेकडेही सरकारचे दुर्लक्ष



।नवी दिल्ली।

: केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने रेल्वे सुरक्षिततेसंबंधीच्या मूलभूत मुद्द्यांवर संपूर्ण तडजोड केली, असा आरोप काँग्रेसने मंगळवारी केला. ओडिशामधील बालासोर येथे गेल्या महिन्यात झालेला रेल्वे अपघात मानवी चुकीमुळे झाला होता. व्यवस्थापन आणि राजकीय नेतृत्वाचे अपयश त्याला कारणीभूत होते अशी टीका काँग्रेसने केली.

सिग्नल यंत्रणेतील चुकीमुळे हा अपघात झाल्याचा निष्कर्ष अपघाताची चौकशी करणाऱ्या उच्चस्तरीय चौकशीने काढला आहे. सिग्निलग आणि दूरसंचार (एस अँड टी) विभागामध्ये अनेक स्तरांवर झालेल्या चुकांवर त्यामध्ये बोट ठेवण्यात आले आहे. यापूर्वी झालेल्या चुका नोंदवल्या गेल्या असत्या तर बालासोरचा अपघात टाळता आला असता, असेही या चौकशी अहवालात सुचवण्यात आले आहे.

या अहवालावर प्रतिक्रिया देताना काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, 'आम्ही इतके दिवस हेच सांगत होतो. वंदे भारतच्या उद्घाटनाचा खुळेपणा, बुलेट ट्रेनचा सोस यामध्ये मोदी सरकारने रेल्वेच्या मूलभूत सुरक्षा मुद्द्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे'. जिथे फोटो काढण्याची संधी नसते आणि बातम्यांच्या मथळ्यांमध्ये नाव येत नाही त्यामध्ये मोदींना रस नसतो, असा आरोपही रमेश यांनी केला.

## पाकिस्तानी पंतप्रधानांना मोदी यांनी खडसावले

### »दहशतवाद परविणाऱ्यांवर नि:संकोचपणे टीका व्हावी

।नवी दिल्ली ।


वृत्तसंस्था : महाईन्यूज

**धोरण म्हणून सीमेपलिकडे दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशांवर टीका करताना संकोच करू नये, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानचे नाव न घेता खडसावले. शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) दूरदृष्य प्रणालीद्वारे झालेल्या शिखर परिषदेमध्ये ते बोलत होते. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासह अन्य नेत्यांसमक्ष पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाज शरीफ यांना मोदी यांनी सुनावले..**

सध्या एससीओचे अध्यक्षपद भारताकडे असल्याने या शिखर परिषदेचे यजमानपद मोदी यांच्याकडे होते. यावेळी मोदी यांनी दहशतवाद आणि दशतवादाला अर्थ पुरवठ्याची समस्या सोडवण्यासाठी निर्णायक कृती करण्याची गरज असल्याचे मत मांडले. दहशतवादाचा बिमोड करताना दुहेरी मापदंड नसावेत असेही ते म्हणाले. एससीओमधील सदस्य देशांनी आपापसातील सहकार्य वाढवतानाच परस्परांचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर करावा असेही मोदी यांनी चीनचे नाव न घेता नमूद केले. या शिखर परिषदेत कझाकस्तान, किर्गिस्तान, ताजिकिस्तान, उझबेकिस्तान आणि इराण या देशांचे प्रमुखही सहभागी झाले होते.

एससीओ परिषदेच्या पार्श्वभूमीवर मोदी आणि पुतिन यांनी ३० जून रोजी दूरध्वनीद्वारे चर्चा केली होती. दोन्ही देशांनी या संभाषणाबाबत दिलेल्या निवेदनांमधील तफावत समोर आली आहे. भारताच्या ८६ शब्दांच्या निवेदनात युक्रेन युद्धावर चर्चेतून तोडगा काढण्याचा सल्ला मोदींनी दिल्याचे म्हटले आहे. तर क्रेमलिनने जारी केलेल्या १९७ शब्दांच्या निवेदनात वॅग्नर गटाच्या बंडानंतर कायदा-सुव्यवस्था कायम राखण्याच्या पुतिन यांच्या प्रयत्नांना मोदींनी पाठिंबा दिल्याचे म्हटले आहे.

आपल्या अमेरिका दौऱ्याबाबतही मोदींनी माहिती दिल्याचा दावा रशियाने केला आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात हे दोन्ही उल्लेख नाहीत.



### शरीफ यांचा 'साळसूदपणा'

»या परिषदेमध्ये पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी दहशतवादाच्या मुद्द्यावर भाष्य केले. दहशतवाद हा बहुतोंडी राक्षस असून वैयक्तिक, संघटनात्मक किंवा सरकारी पातळीवरील दहशतवादाचा दृढनिश्चयाने सामना केला पाहिजे, असे शरीफ म्हणाले. त्याच वेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर राजनैतिक फायदा घेण्यासाठी दहशतवादाच्या मुद्द्याचा वापर केला जाऊ नये, असा सल्लाही त्यांनी भारताचे नाव न घेता दिला. दहशतवादाचा सामना करण्यासाठी पाकिस्तानने मोठा त्याग केल्याचा दावाही शरीफ यांनी केला.

### 120 देशांना हवे मोदींचे नेतृत्व

»120 देशांना पंतप्रधान मोदींनी नेतृत्व करावे अशी इच्छा आहे', पाकिस्तानींनी कौतुकाचे पूल बांधले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे नेतृत्व करावे आणि जागतिक आघाडीवर त्यांचा आवाज व्हावा, अशी जगातील 120 देशांच्या राष्ट्रप्रमुखांची आणि सरकारची इच्छा आहे. या मुद्द्यावर बोलताना पाकिस्तानी महिला यूट्यूबर सना अमजदने पाकिस्तानी लोकांना प्रश्न केला. त्याला प्रत्युत्तर देताना पाकिस्तानी जनतेने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले आणि ते म्हणाले की ते आपल्या देशासाठी जे काही करत आहेत ते खूप चांगले करत आहेत.

# सोनाली कुलकर्णीची 'गुडन्यूज'




मराठी मनोरंजन विश्वामध्ये आपल्या अभिनयानं आणि सौंदर्यानं मराठी प्रेक्षकांना वेडं करणाऱ्या सोनालीची अदा नेहमीच प्रेक्षकांना घायाळ करत असते. आता सोनाली ही एका वेगळ्या कारणासाठी चर्चेत आली आहे. सोनालीच्या त्या गोड बातमीनं चाहत्यांनी तिच्यावर कौतूकाचा वर्षाव केला आहे.

सोनालीची ती बातमी व्हायरल होताच चाहत्यांनी तिला दिलेल्या प्रतिक्रियाही भलत्याच भन्नाट आहे. सोनालीचा चाहतावर्ग मोठा आहे. सोशल मीडियावर सोनाली ही नेहमीच चर्चेत असते. इंस्टावरही तिला फॉलो करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. आता तर सोनालीच्या गुड न्युजच्या बातमीनं चाहत्यांना कमालीचा आनंद झाला आहे. तिची ती बातमी खरं म्हणायची की आणखी काही याची तिच्या चाहत्यांना उत्सुकता आहे.

लॉकडाऊनमध्ये रजिस्टर मॅरेज केल्यानंतर मागील वर्षी सोनाली कुलकर्णीने कुणाल बेनोडेकरसोबत लंडनमध्ये धुमधडाक्यात लग्न केले. आता नुकतीच सोनाली कुलकर्णीने 'पटलं तर घ्या विथ जयंती' या टॉकशोमध्ये एक गुडन्यूज दिली आहे.

# लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेत्री समांथा प्रभू अभिनय क्षेत्रातून घेणार ब्रेक!



दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक समांथा रुथ प्रभू आहे. तिनं आपल्या दमदार अभिनयानं प्रेक्षकांची मन जिंकली आहेत. तसेच 'पुष्पा' चित्रपटातील 'ऊ अंटावा' या तिच्या गाण्यानं अक्षरशः लोकांना वेड लावलं आहे. अशातच समांथानं अभिनय क्षेत्रातून ब्रेक घेण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. आरोग्याच्या कारणास्तव समांथानं हा निर्णय घेतल्याचं समोर आलं आहे.

'शाकुंतलम' या चित्रपटानंतर समांथा प्रभू तिच्या आगामी 'सिटाडेल' या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. यासाठी वरुण धवनबरोबर ती शूटिंग करत आहे. शिवाय तिचा विजय देवरकोंडबरोबर 'कुशी' हा चित्रपट प्रदर्शनाच्या मार्गावर आहे. अशा व्यग्र वेळापत्रकामुळे समांथाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे आरोग्याची काळजी घेण्यासाठी समांथानं एक वर्षांकरिता अभिनय क्षेत्रातून ब्रेक घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# साजिद खानच्या चित्रपटात सौंदर्या शर्मा दाखवणार तिचे सौंदर्य



टीव्ही रिॲलिटी शो 'बिग बॉस सीझन 16' ची स्पर्धक सौंदर्या शर्मा सध्या खूप चर्चेत आहे. तिच्या सौंदर्य आणि ग्लॅमरमुळे सौंदर्याच्या हातात एक मोठा प्रोजेक्ट आला आहे. बिग बॉसच्या घरात आपल्या हॉट लूकमुळे प्रसिद्धीझोतात आलेली सौंदर्या लवकरच एका आयटम साँगमध्ये तिच्या सौंदर्याची झलक दाखवू शकते. सौंदर्या तिचा बिग बॉस सह-स्पर्धक साजिद खानच्या आगामी चित्रपटाचा एक भाग बनणार असल्याच्या बातम्या आहेत.

सौंदर्या शर्माने भलेही बिग बॉस जिंकले नसले तरी तिने तिच्या चाहत्यांच्या हृदयात खास स्थान निर्माण केले आहे. सोशल मीडियावरही ही अभिनेत्री खूप लोकप्रिय आहे. सलमान खानने होस्ट केलेल्या शोमध्ये सौंदर्या तिच्या अप्रतिम व्यक्तिमत्त्वामुळे खूप लोकप्रिय झाली आहे. शो सोडल्यानंतर सौंदर्याला काही मनोरंजक प्रोजेक्ट मिळाले आहेत. वृत्तानुसार, साजिद खानच्या आगामी चित्रपटातील एका आयटम साँगसाठी सौंदर्याला अप्रोच करण्यात आले आहे.

# पाळणा कधी हलणार...



अभिनेता वरुण धवन त्याच्या 'सिटाडेल' या वेब सीरिजमुळं चर्चेत आहे. या सिरिजची शूटिंगही सुरू झाली असून वेब सीरिजमधील अभिनेता वरुण धवनचा फर्स्ट लूक शेअर करण्यात आला आहे. वरुण नुकताच एका कार्यक्रमात आलिया भट्टसोबत दिसला. यावेळी पापाराझींनी त्याला एक प्रश्न विचारला आणि त्यानंतर वरुणच्या उत्तरानं आता एकच चर्चा रंगली आहे. याविषयी पापाराझींनी वरुणला त्याच्या कुटुंब नियोजनाबाबत प्रश्न विचारला. यावर वरुण धवनने मजेशीर उत्तर दिले.

पापाराझींनी वरुणला विचारले की, 'तो फॅमिली प्लॅनिंग केव्हा करत आहे'. यावर वरुणने सांगितले की, "आलिया आई झाली तु बाबा झालास तर काय सगळ्यांनीच... मी माझ्या बायकोला विचारतो. तिला सांगतो की त्यांनी तसं सांगितलं आहे".

हे ऐकून तिथे उपस्थित सर्व लोक हसू लागले. याशिवाय या कार्यक्रमात आलियाने तिच्या करिअरबद्दल आणि मुलीबद्दलही मोकळ्या गप्पा मारल्या.

वरूण आणि नताशानं 24 जानेवारी 2021 रोजी लग्न केलं. वरुण आणि नताशानं गेल्यावर्षी अलिबागमध्ये कुटुंबातील सदस्य आणि जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत लग्न केलं होतं. मनोरंजन विश्वात अनेक बॉलिवूड सेलिब्रिटी चाहत्यांना गूड न्यूज देत आहेत. आलिया-रणबीर, देबिना-गुरमीत आणि बिपाशा-करण यांच्या घरी परीचं स्वागत करण्यात आलं आहे. अशातच अणि नताशा यांच्या घरी पाळणा हलणार अशी चर्चा रंगली होती. मात्र वरुण आणि नताशाने या सर्व अफवा असल्याचं सांगितलं होतं. मात्र वरुणचे चाहते ही गूडन्यूज ऐकण्यासाठी उत्सुक आहेत.

# मनोरंजनाच्या वाट्याला भोपळा! अशोक पंडित चिडले, आमची काळजी कुणालाच नाही

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बजेट सादर केला. या बजेटमध्ये चित्रपटाची तिकिटे आणि ओटीटी सबस्क्रिप्शनबाबत मनोरंजन उद्योगालाही काही दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती, पण तसं काही झालं नसल्याने चित्रपटप्रेमींची नाराजी दिसत आहे.



याबाबत आता चित्रपट निर्माते अशोक पंडित यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. चित्रपट इंडस्ट्रीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांनी भारत सरकारवर टिका आहे. 'एएनआय' या वृत्तसंस्थेशी बजेटबद्दल बोलताना चित्रपट निर्माते अशोक पंडित म्हणाले, 'आपली इंडस्ट्री देशातील सर्वात मोठा करदाता आहे. चित्रपट उद्योग दरवर्षी सर्वाधिक कर भरतो, पण आपल्या मनोरंजन उद्योगाकडे सर्वच सरकारांचे नेहमीच दुर्लक्ष झाले आहे. हे दुर्दैव आहे.'

अर्थसंकल्पात इतर उद्योगांबद्दल ज्याप्रकारे बोलले गेले आहे, मग ते वस्त्रोद्योग असो, साबण उद्योग असो की आरोग्य उद्योग असो, मात्र इंडस्ट्रीबद्दल काहीही बोललं जातं नाही.'

फिल्म अँड टेलिव्हिजन डायरेक्टर्स असोसिएशन अध्यक्ष, अशोक पंडित पुढे म्हणतात, 'ज्या प्रकारे इतर उद्योग ओळखले जातात आणि त्यावर चर्चा केली जाते. त्या उद्योगाच्या फायद्यांचा विचार केला जातो. मात्र आमच्या मनोरंजन उद्योगाबद्दल कसं काहीच घडत नाही. हा उद्योग कसा वाचवायचा, कसा वाढवायचा, याचा कुणीच विचार करत नाही. कोव्हिड-19 महामारीच्या काळातही आम्ही घरात बसून लोकांचे मनोरंजन केले आहे.'

मिळालेल्या माहितीनुसार, सिंगल स्क्रीन थिएटर्स आणि मल्टिप्लेक्सच्या तिकीट दरात मोठी तफावत आहे. त्याचप्रमाणे, जर आपण OTT प्लॅटफॉर्मबद्दल बोललो, तर त्याचा सबस्क्रिप्शन दर देखील खूप जास्त आहे. हे जर कमी झाले तर जास्तीत जास्त लोक चित्रपटांकडे खेचले जातील आणि सर्वांना त्याचा फायदा होईल. मात्र, या अपेक्षाही अर्थसंकल्पाने नाराज केलं आहे.

# वेस्ट इंडिजविरुद्धच्या T20 मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा!

## » रोहित शर्मासिहर 5 खेळाडूंना डच्चू

महाईन्यूज ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**वेस्ट इंडिज दौऱ्यातील टी-२० माालिकेसाठी भारताचा संघ जाहीर करण्यात आला आहे. या मालिकेसाठी रोहित शर्माला पुन्हा एकदा संघाबाहेर ठेवण्यात आले आहे. पण मुंबई इंडियन्समधील खेळाडूंची मात्र या संघात निवड करण्यात आली आहे.**

बीसीसीआयच्या वरिष्ठ पुरुष निवड समितीने बुधवारी वेस्ट इंडिजविरुद्ध कॅरिबियन बेटांवर आणि फ्लोरिडा, यूएसए येथे खेळल्या जाणाऱ्या आगामी पाच सामन्यांच्या T20 मालिकेसाठी भारताचा संघ निवडला. अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले आणि त्यानुसार भारतीय संघ निवडण्यात आला आहे.

वेस्ट इंडिजच्या दौऱ्यासाठी भारताचे कसोटी आणि वनडे संघ यापूर्वी निवडण्यात आले होते. या दोन्ही संघांचे कर्णधारपद हे रोहितकडेच आहेत. या दौऱ्यात रोहित टी-२० संघाचे नेतृत्व करेल, असे वाटत होते. पण सध्याच्या घडीला रोहितला बीसीसीआयच्या निवड समितीने टी-२० संघापासून लांब ठेवले आहे. त्यामुळे आता या संघाचे कर्णधारपद हार्दिक पंड्याकडे असेल. यापूर्वी हार्दिकने काही मालिकांमध्ये भारताच्या टी-२० संघाचे नेतृत्व केले आहे. पण त्याला हंगामी कर्णधार म्हटले जाते. निवड समितीने अजूनही टी-२० संघाचे कर्णधारपद नेमकं कोणाकडे असेल हे स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे भारताच्या टी-२० संघाच्या नेतृत्वाबाबत सध्या संभ्रमाचे वातावरण आहे.या संघाचे उपकर्णधार हे पद सूर्यकुमार यादवकडे असेल, त्याचबरोबर संघात दोन यष्टीरक्षक आहेत. इशान किशन आणि संजू सॅमसन असे दोन यष्टीरक्षक या संघात पाहायला मिळत आहे. या संघात यशस्वी जैस्वाललाही संधी देण्यात आली आहे. त्याचबरोबर मुंबई इंडियन्सच्या तिलक वर्माची या संघात वर्णी लागली आहे. आगामी टी-२० विश्वचषक पाहता हा संघ निवडण्यात आले आहे, असे म्हटले जात आहे.



भारताचा संघ: इशान किशन (विकेटकीपर), शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल, तिलक वर्मा, सूर्य कुमार यादव, संजू सॅमसन (विकेटकीपर), हार्दिक पांड्या (कर्णधार), अक्षर पटेल, युझवेंद्र चहल, कुलदीप यादव, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, उमरान मलिक,

### आगरकर यांनी पहिल्याच बैठकीत केला रोहित व कोहलीसह पाच खेळाडूंचा गेम

मुंबई : निवड समितीचे अध्यक्षपद स्विकारल्यावर अजित आगरकर यांनी पहिल्याच बैठकीत रोहित शर्मा आणि विराट कोहली या दिग्गज खेळाडूंसह पाच दमकार क्रिकेटपटूंना संघाबाहेर केले आहे. त्यामुळे पहिल्याच बैठकीत आगरकर यांनी आपले इरादे स्पष्ट केल्याचे म्हटले जात आहे. बैठक झाली. या बैठकीत आगरकर यांनी भारताच्या दिग्गज खेळाडूंना स्पष्ट भाषेत इशारा दिल्याचे समोर आले आहे. वेस्ट इंडिजच्या दौऱ्यासाठी भारताचे कसोटी आणि वनडे संघ यापूर्वी निवडण्यात आले होते. या दोन्ही संघांचे कर्णधारपद हे रोहितकडेच आहेत. या दौऱ्यात रोहित टी-२० संघाचे नेतृत्व करेल, असे वाटत होते. पण सध्याच्या घडीला रोहितला बीसीसीआयच्या निवड समितीने टी-२० संघापासून लांब ठेवले आहे. त्यामुळे आता या संघाचे कर्णधारपद हार्दिक पंड्याकडे असेल. दुसरीकडे कोहली हा मर्यादीत षटकांच्या सामन्यांत चांगल्या धावा करत असला तरी त्याला यावेळी संघातून बाहेर काढण्यात आले आहे.

रोहित आणि कोहली यांनाच फक्त या संघातून बाहेर काढण्यात आले आहे, असे नाही. या संघातून अष्टपैलू रवींद्र जडेजालाही संधी देण्यात आलेली नाही. वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीदेखील या संघात नाही. आयपीएलमध्ये दमदार धावा करणाऱ्या ऋतुराज गायकवाडलाही यावेळी संघाबाहेर ठेवण्यात आले आहे. शमीचे वय जास्त आहे, अशी सबब निवड समिती देऊ शकते, पण ऋतुराज हा का संघाबाहेर आहे, याचे कारण समजत नाही. कारम ऋतुराज हा चांगल्या फॉर्मात आले, त्याने आयपीएलमध्ये खोऱ्याने धावा फटकावल्या होत्या. तो पूर्ण पणे फिटही आहे. पण तरीही त्याला संघाबाहेर कायम ठेवण्याता निर्णय अजित आगरकर यांच्या निवड समितीने घेतला आहे.

# तिसऱ्या Ashes कसोटीपूर्वी इंग्लंडला बसला मोठा धक्का

## » ओली पोप दुखापतीमुळे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अॅशेस कसोटी क्रिकेट मालिकेला मुकला

। लीड्स ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सलग इंग्लंडचा उपकर्णधार ओली पोप दुखापतीमुळे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अॅशेस कसोटी क्रिकेट मालिकेला मुकला आहे. दुसऱ्या कसोटीत त्याच्या उजव्या हाताचा खांदा निखळला. आता त्याच्या खांद्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे मालिकेतील उर्वरित तीन कसोटींत तो खेळू शकणार नाही.**

२५ वर्षी पोपला दुसऱ्या कसोटीतील ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात क्षेत्ररक्षण करते वेळी चेंडू अडविताना तो पडला. त्यात त्याच्या खांद्याला दुखापत झाली. इंग्लंडला राखीव खेळाडूची परवानगी मिळाली नसल्याने तिसऱ्या दिवशी त्याची दुखापत बळावली.

सोमवारी त्याच्या दुखऱ्या खांद्याच्या स्कॅनचा अहवाल आला. त्यात त्याची दुखापत गंभीर असल्याचे लक्षात आले, अशी माहिती इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्डाने मंगळवारी पत्रकाद्वारे दिली. इंग्लंडने त्याच्या जागी दुसऱ्या कोणाचीही संघात निवड केलेली नाही. मालिकेतील तिसरी कसोटी गुरुवारपासून हेडिंग्ले येथे खेळली जाणार आहे. पाच सामन्यांच्या मालिकेत यजमान इंग्लंड संघ ०-२ने पिछाडीवर आहे.

मेलबर्न : अॅलेक कॅरीने इंग्लंडचा फलंदाज जॉनी बेअरस्टोला यष्टिरक्षक केलेल्या घटनेची चर्चा अद्याप थांबलेली नाही. दोन्ही देशांतील आजी-माजी खेळाडू अद्यापही 'खेळ भावने'च्या मुद्द्यावरून एकमेकांवर टीका करीत आहेत. यात ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार मार्क टेलर यांची भर पडली आहे. ५८ वर्षीय टेलर यांनी यासाठी बेअरस्टोलाच दोषी ठरविले आहे. ते म्हणाले, 'कसोटी क्रिकेटमध्ये आपण दहा पद्धतीने बाद होऊ शकतो, हे फलंदाजाने लक्षातच ठेवायला हवे. त्यातील एक प्रकार म्हणजे यष्टिचीत होणे. त्यामुळे हे खेळ भावनेच्या विरुद्ध आहे, असे तुम्ही म्हणू शकत नाही.

चेंडू डेड झाला नसतानाही तुम्हाला वाटेल तेव्हा तुम्ही क्रीझ सोडून बाहेर भटकायला जाऊ शकत नाही. तसे असेल, तर यष्टिरक्षक तुम्हाला बाद करणारच.

बरे क्रिकेटमध्ये असे काही पहिल्यांदाच घडलेले नाही. त्यामुळे यासाठी पॅट कमिन्सच्या ऑस्ट्रेलिया संघाला दोषी ठरविणे चुकीचे आहे.'

